21 JUN 2026

तरुण भारत



कोल्हापूर : डी. आर. माने महाविद्यालयाने निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल कुलगुरू राजनीश कामत हे प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम यांना सन्मानित करताना.

# विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती यादीत डी. आर. माने महाविद्यालय अव्वल

**त. भा. प्रतिनिधी, कागल**

सन २०२५ २०२६ या शैक्षणिक वर्षातील शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीकरिता दि कागल एज्युकेशन सोसायटी संचलित डी. आर. माने महाविद्यालयाने मानवविज्ञान विद्याशाखेमध्ये निमशहरी या गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे.

त्यासंदर्भात शिवाजी विद्यापीठ येथे कुलगुरू प्रा. डॉ. राजनीश कामत यांच्या अध्यक्षतेखाली गुणगौरव समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम, कार्यालयीन अधीक्षक बाबुराव पुंडे, प्रा. सचिन कांबळे, प्रा. विजय कांबळे, प्रशासकीय कर्मचारी सुधीर कदम आदी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या या विशेष यशासाठी दि कागल एज्युकेशन सोसायटीचे सचिव भैय्या माने, उपाध्यक्ष सुनील माने, संचालक प्रा. बिपीन माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## सलग पाच वर्षे प्रथम क्रमांक

शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीकरिता सलग पाच वर्षे डी. आर. माने महाविद्यालयाने निमशहरी गटातून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. त्याबद्दल सर्व स्तरातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे. महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. या विशेष गौरवात्मक यशासाठी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ. प्रवीण चौगले, प्राचार्य डॉ. नंदकुमार कदम, शिष्यवृत्ती विभागाचे प्रमुख प्रा. सचिन कांबळे यांचे बहुमोल असे परिश्रम आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JUN 2026

सकाळ

# अहिल्यादेवींची संघर्षगाथाही समाजासमोर यावी

## प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव : शिवाजी विद्यापीठात इंग्रजी चरित्रग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. २० : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जाज्ज्वल्य कार्यकर्तृत्वासह त्यासाठी त्यांनी सोसलेल्या संघर्षाची गाथाही समाजासमोर यायला हवी, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली.

विद्यापीठात आज रामभाऊ लांडे लिखित 'लाइफ अ‍ॅन्ड वर्क ऑफ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर' या इंग्रजी चरित्र पुस्तकाचे प्रकाशन झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. मल्हार सेनेचे बबन रानगे प्रमुख उपस्थित होते.



कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या इंग्रजी चरित्रग्रंथाचे प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते झाले. शेजारी बबन रानगे, रामभाऊ लांडे, रावसाहेब पुजारी, मच्छिंद्र गोफणे, अवनीश पाटील आदी.

अहिल्यादेवी होळकर यांनी वडील आणि सासरे यांच्या कणखर पाठिंब्याने आपल्या कार्याची सुरुवात केली असली, तरी एक महिला म्हणून त्यांना अनेक अडचणींतून जावे लागले. अनेक समस्यांवर मात करीत त्यांनी आपली वाटचाल केली आणि त्यातून उत्तुंग कार्याची उभारणी केली. ते कार्य महत्त्वाचे आहेच. मात्र, त्यामागील संघर्ष, त्यागही जनतेसमोर यायला हवा. त्यादृष्टीने अभ्यासक आणि संशोधकांनी संदर्भांचा धांडोळा घेतला पाहिजे, असे आवाहन प्र-कुलगुरू डॉ. जाधव यांनी केले.

रामभाऊ लांडे हे केवळ लेखक नाहीत, तर होळकरशाहीचे संशोधक आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून अहिल्यादेवींविषयीचे पुस्तक इंग्रजीतून साकार होणे, महत्त्वाचे आहे. उपलब्ध साधनांचा आधार घेऊन त्यांनी अहिल्यादेवींच्या कार्यकर्तृत्वाचे विविध पैलू उलगडल्याचे इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी सांगितले.

रावसाहेब पुजारी, डॉ. रणधीर शिंदे, प्रभंजन माने, दत्तात्रय मचाले, अशोक परीट, चांगदेव बंडगर, नारायण मोटे-देसाई, प्रताप चिपळूणकर, यश आंबोळे, अजय गोदे, अजय पुजारी, वैभव जानकर, संतोष कोळेकर उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासनाचे समन्वयक डॉ. मच्छिंद्र गोफणे यांनी स्वागत केले. डॉ. दत्तात्रय घुटुगडे यांनी आभार मानले.

2 1 JUN 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ४१० गुणवंत विद्यार्थ्यांना विद्यापीठाची २९.५५ लाखांची शिष्यवृत्ती



**कोल्हापूर/प्रतिनिधी :** शैक्षणिक गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढविण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी एकूण ४१० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना २९ लाख ५५ हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यामधील सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या अधिविभागांचे प्रमुख आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते आज करण्यात आला. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यावेळी प्रमुख उपस्थित होत्या.

पदव्युत्तर प्रवेश विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या योजनेसाठी यंदा १,१३८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी विविध घटकांतील पात्र विद्यार्थ्यांची निवड करून शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. योजनेसाठी ४१० विद्यार्थी पात्र ठरले. यात विद्यार्थिनींची संख्या ३५६ इतकी आहे.

कुलगुरू डॉ. कामत यावेळी म्हणाले, विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेमुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत आहे. गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासात आर्थिक बळ देण्याबरोबरच महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी ही योजना महत्त्वपूर्ण ठरली आहे. आज उपस्थित महाविद्यालयांनी आपली गुणवत्तेची परंपरा कायम राखण्याबरोबरच इतर महाविद्यालयांनाही या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

**विविध घटकांना शिष्यवृत्तीचे वितरण**

सर्वसाधारण घटकातून सर्वाधिक २९२ विद्यार्थी पात्र ठरले. त्यामध्ये २४३ विद्यार्थ्यांना पदवी शिष्यवृत्ती आणि ४९ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली. या घटकांसाठी १७.०५ लाख रुपये वितरित करण्यात आले. आर्थिक दुर्बल घटकातून ५६ विद्यार्थी, निराधार घटकातून ४३ विद्यार्थी, दिव्यांग घटकातून ८ विद्यार्थी, तर क्रीडा घटकातून ११ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या सर्व घटकांसह एकूण शिष्यवृत्ती रक्कम २९.५५ लाख रुपये इतकी वितरित करण्यात आली.

**सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळविणारी महाविद्यालये**

विद्याशाखानिहाय आणि ग्रामीण, निमशहरी व शहरी गटानुसार सर्वाधिक गुणवत्ता शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयांची नावे (कंसात शिष्यवृत्तीचा आकडा याप्रमाणे) अशी-

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा: शहरी गट : तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (११), निमशहरी गट : शिवराज कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड डी.एस. कदम सायन्स कॉलेज, गडहिंग्लज (१३), अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ फार्मसी, आष्टा (१३), ग्रामीण गट : संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, महागाव (ता. गडहिंग्लज) (१२),

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा: शहरी गट : द न्यू कॉलेज, कोल्हापूर (९), निमशहरी गट : डी. आर. माने महाविद्यालय, कागल (११), ग्रामीण गट : भोगावती महाविद्यालय, कुरूकली (५),

मानवविज्ञान विद्याशाखा: शहरी गट : द न्यू कॉलेज, कोल्हापूर (१०), निमशहरी गट : डी. आर. माने महाविद्यालय, कागल (८), ग्रामीण गट : पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी आर्ट्स कॉलेज, झरे (१०),

आंतरविद्याशाखीय विद्याशाखा: शहरी गट : कॉलेज ऑफ नॉन कन्व्हेन्शनल व्होकेशनल कोर्स फॉर विमेन, कोल्हापूर (६), निमशहरी गट : संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव (९). ग्रामीण गट : निरंक

यावेळी कुलगुरू डॉ. कामत यांच्या हस्ते या महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा प्रशस्तीपत्र, शाल व ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. त्यामध्ये डॉ. एस. एस. कदम, डॉ. एस.एच. सावंत, डॉ. व्ही.एम. पाटील, डॉ. एस.एल. कदम, डॉ. एस.एस. पाटील, डॉ. राजाराम पाटील, डॉ. आर.जी. कुलकर्णी, डॉ. डी.एम. पाटील यांचा समावेश होता. कार्यक्रमाला परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. वर्षा मैंदर्गी, डॉ. अजय साळी यांच्यासह महाविद्यालयांचे शिक्षक व अधिकारी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अभिजीत लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव तेजस्विनी भूतकर यांनी आभार मानले.

21 JUN 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून ७६१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील आजअखेर ७६१ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

सध्या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. शनिवारी बीए., बी.कॉम., बीएस्सी, बॅचलर ऑफ लॉ, एमजे आदी १७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ३३ केंद्रांवर सुरळीत पार पडल्या.